





# गाई, म्हशींमधील भाकड काळ व्यवस्थापन



दुग्ध व्यवसाय करताना गाई, म्हशींचे व्यवस्थापन आणि संतुलित आहाराचा योग्य प्रमाणात पुरवठा या दोन बाबींकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. यामध्ये प्रामुख्याने जनावरांचे लसीकरण, जंतनाशक औषध पाजणे, गाई-म्हशींची विण्याअगोदर आणि विल्यानंतर घ्यावयाची काळजी, वळूचे व्यवस्थापन आणि वासरू जन्मल्यानंतर वासरांचे संगोपन करणे इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा समावेश होतो. त्याचबरोबर गाई भाकड करणे हे व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

पशुपालकांनी गाई, म्हशीची योग्य काळजी घेतल्यास दूध उत्पादनामध्ये वाढ होईल. याकरिता गाय, म्हैस विण्याअगोदर दोन महिने भाकड करावी. असे केल्याने पुढील टप्प्यात गाय, म्हैस एका वेतात ३०५ दिवस अधिक दुग्धोत्पादन क्षमतेपर्यंत पोहचेल. भाकड काळात कासदाह होणार नाही याची काळजी घ्यावी.

गाभण राहिल्यानंतर सातव्या महिन्यापासून हळूहळू दूध काढणे कमी करत जावे. प्रथम एक दिवसाआड नंतर आठ दिवसांतून एकदा, नंतर १५ दिवसांतून एकदा गाय पिळावी. गाय संपूर्ण दूधातून कमी झाल्यापासून ती व्यायल्यानंतर परत दुधात येण्यापर्यंतच्या काळास भाकड काळ असे संबोधतात.

## भाकड करण्याचे फायदे :

गाय, म्हैस भाकड करण्याचा मुख्य उद्देश म्हंणजे शेवटच्या तीन महिन्यांत गर्भाची वाढ झपाट्याने होते, यात तिला स्वत:च्या पोषणाबरोबरच गर्भाचे पोषण आणि कासेत दूध तयार करण्यासाठी लागणारे अन्नघटक, यामुळे तिच्या शरीरावर पोषणद्रव्याचा ताण पडतो. परिणामी गाय, म्हैस अशक्त होते. दुधातून निचरा होणारे क्षार आणि जीवनसत्त्वे सक्तीच्या भाकड काळात देऊन गाय, म्हैस गाभण असताना तसेच त्यानंतर भरपूर दूध देण्याच्या कालावधीत संतुलित, पूरक खाद्याचा गरजेनुसार पुरवठा करावा.

गाय, म्हैस भाकड केल्यामुळे कासेला आराम मिळून, दूध पेशींचे पुनरूज्जीवन केले जाते. ज्यामुळे शेवटच्या महिन्यात कासेची वाढ होण्यास भरपूर वाव मिळतो. ज्याचा फायदा पुढील वेतात अधिक दूध देण्यात होतो. गाय, म्हैस भाकड केल्यामुळे गर्भाची वाढ चांगली झपाट्याने होते. मिळणारे दूध पहिल्या वेतापेक्षा अधिक असते. या सर्व कारणांसाठी विण्यापूर्वी दोन महिने अगोदर गाय, म्हैस भाकड करावी. गाय, म्हशीमध्ये भाकड काळ हा साधारणतः दोन

प्रकाशन

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

महिने ठेवणे आर्थिक दृष्टीने फायदेशीर ठरते.



### गाय, म्हैस भाकड करणे

गाय, म्हैस ज्या वेळेस सात महिन्याची गाभण असते, तेव्हा तिला प्रथम भाकड करणे महत्त्वाचे असते. यासाठी प्रथम गाई, म्हशीला पाण्याचा आणि खाद्याचा ताण द्यावा. यामुळे दूध देण्याचे प्रमाण कमी होईल. दिवसातून एक वेळा दूध काढावे. हळूहळू एक दिवसाआड दूध काढावे. त्यानंतर चार ते पाच दिवसांनी एकदाच दूध काढावे. या पद्धतीचा वापर केल्यास गाईच्या दुधाचे प्रमाण कमी होते. यानंतर गाय, म्हैस आपोआप दूध देण्याचे बंद करते. या व्यवस्थापनातून गाय, म्हैस भाकड करता येते.

भाकड केल्यानंतर कासदाह होऊ नये म्हणून भाकड करण्याच्या शेवटच्या दिवशी चारही सडांत प्रतिजैविकाच्या ट्यूब भराव्यात. त्यामुळे विण्याआधी किंवा व्यायल्यानंतर कासदाह होत नाही. गाईच्या गाभण काळात गर्भाची वाढ पहिले सात महिने हळूवार होते. नंतरच्या तीन महिन्यांत ती झपाट्याने म्हणजे पहिल्या सहा महिन्यांच्या वाढीपेक्षा तिप्पट होते. याचकाळात पुढील दूधवाढीच्या दृष्टीनेही जादा शक्तीचा संचय करून ठेवण्याची जरूरी असते. कासेतील पेशीचे पुनरूज्जीवनही याच काळात होते. म्हणून गाईच्या गाभणपणाच्या शेवटच्या आठ आठवड्यातील जादा वाढीव खुराकाला महत्त्व आहे.

### भाकड केल्यानंतर घ्यावयाची निगा

भाकड गाई, म्हशीला कळपापासून वेगळे ठेवावे. दररोज खरारा करावा. दोन ते तीन वेळेस मुबलक स्वच्छ पाणी पाजावे. योग्य प्रमाणात हिरवा चारा, आठ ते नऊ किलो सुका चारा आणि खुराक (आंबवण) द्यावे. योग्य व्यवस्थापन केल्यानंतर शेवटच्या महिन्यात गाईचे वजन वाढते. यात गर्भाशयाचे वाढलेले (वजन), आकारमान, वासराचे वजन, वारेचे वजन आणि गर्भाशयातील नैसर्गिक पाणी या सर्वांचा समावेश आहे. अशाप्रकारे भाकडकाळात योग्य व्यवस्थापन करावे.


www.mafsu.in

www.knpcvs.in

✲ मार्गदर्शक ✲

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा, मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन, मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण, मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.